महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १०२ /२०२४ दि. १५/०५/२०२४

**—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—**

**ज्याअर्थी, कापूरबावडी** वाहतूक उपविभागचे हद्दीत **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने** १४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघ अंतर्गत होणाऱ्या भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि. २०/०५/२०२४ रोजी मतदान होणार आहे. त्यानुसार मतदान केंद्रावर ई.व्ही.एम. मशिन साहित्य तसेच निवडणूक अधिकारी व पोलीस अंमलदार यांची ने–आण करण्याकरीता काशिमिरा पोलीस स्टेशन ते वर्सोवा नाका मधील मुंबई – अहमदाबाद महामार्ग व वर्सोवा नाका ते माजिवडा चौक मधील ठाणे घोडबंदर महामार्ग येथे सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **'प्रवेश बंद'** करणेबाबत लेखी कळविण्यात आले आहे, सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) ठाणे घोडबंदर वाहिनीवरून माजिवडा मार्गे घोडबंदर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **ज्युपिटर हॉस्पिटल समोरील माजिवडा ब्रिजवरील वाय जंक्शन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मुंबई – नाशिक वाहिनीवरील ज्युपिटर हॉस्पिटल समोरील माजिवडा ब्रिजवरील वाय जंक्शन येथून उजवीकडे वळण घेवून पुढे सरळ जावून खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) ठाणे घोडबंदर वाहिनी ज्युपिटर हॉस्पिटल समोरील स्लीप रोडने गोल्डन क्रॉस, कापूरबावडी सर्कल कडून घोडबंदर कडे जाणा–या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **ज्युपिटर हॉस्पिटल समोरील कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मुंबई – नाशिक वाहिनी ज्युपिटर हॉस्पिटल समोरील माजिवडा ब्रिजवरील वाय जंक्शन येथून उजवीकडे वळण घेवून पुढे सरळ जावून खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २०/०५/२०२४ रोजी सायंकाळी १८:०० ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

CamScanner

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,</u>
स.पो.आ. वागळे वाहतूक विभाग, व पोलीस निरीक्षक, कापूरबावडी वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CS CamScanner